दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ९८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

आजपासून 'ऑर्केस्ट्रा बार'चे परवाने बंद!; नूतनीकरणही थांबवले

मुंबई : हॉटेल, उपाहारगृहे आणि बारमधील अश्लील नृत्यांवर बंदी घालणाऱ्या कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन 'ऑर्केस्ट्रा'च्या नावाखाली सुरू असणाऱ्या गैरप्रकारांना चाप लावण्यासाठी गृह विभागाने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. यापुढे राज्यात 'महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१' अंतर्गत ऑर्केस्ट्रासाठी नवीन परवाने दिले जाणार नाहीत, तसेच जुन्या परवान्यांचे नूतनीकरणही केले जाणार नाही, असा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. गृह विभागाने सोमवारी यासंदर्भातील परिपत्रक जारी करून सर्व

'बँक ऑफ बडोदा'च्या एक टीबी डेटाची चोरी; डार्क वेबवर उपलब्ध

नवी दिल्ली : सार्वजनिक क्षेत्रातील देशातील एक अग्रेसर आणि महत्त्वाची बँक असलेल्या 'बँक ऑफ बडोदा'चा तब्बल १ टीबी इतका प्रचंड आणि संवेदनशील डेटा चोरीला गेला आहे. हा सर्व चोरलेला डेटा आता डार्क वेबवर मोफत उपलब्ध करून देण्यात आला असून, यामध्ये बँक ग्राहकांची वैयक्तिक माहिती, खात्यांचे सविस्तर तपशील आणि अंतर्गत कागदपत्रांचा समावेश असल्याची माहिती मिळत आहे. हॅकर्सनी केलेल्या दाव्यानुसार, या १ टीबीच्या महाविशाल डेटाबेसमध्ये बँक ग्राहकांची अत्यंत संवेदनशील माहिती समाविष्ट आहे.

थोडक्यात वार्ता

MPSC औषध निरीक्षक परीक्षा वादाला नवे वळण; पेपरफुटीची तक्रारच बनावट असल्याचा दावा

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) औषध निरीक्षक पदाच्या भरती परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या परीक्षेत गैरव्यवहार झाल्याची तक्रार समोर आल्यानंतर मोठी चर्चा सुरू झाली होती. मात्र, आता ही तक्रारच खोटी असल्याचा दावा समोर आला आहे. एमपीएससीमधील सूत्रांच्या माहितीनुसार, पुन्हा परीक्षा व्हावी या उद्देशाने तक्रारदाराने कथित बनाव रचल्याची शक्यता तपासली जात आहे. या प्रकरणामुळे राज्यात खळबळ उडाली होती. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर एमपीएससीने या तक्रारीची गंभीर दखल घेत चौकशी सुरू केली. मिळालेल्या माहितीनुसार, औषध निरीक्षक पदासाठीची लेखी परीक्षा 22 मार्च रोजी ऑफलाइन पद्धतीने घेण्यात आली होती. त्यानंतर 12 जून रोजी निकाल जाहीर झाला. पात्र उमेदवारांच्या मुलाखती 1 ते 21 जुलैदरम्यान पार पडल्या आणि 22 जुलै रोजी अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर 23 जुलै रोजी आयोगाला ई-मेलद्वारे पेपरफुटीची तक्रार प्राप्त झाली. आयोगाने तातडीने तक्रारदाराकडे पुरावे मागवले आणि तक्रारदार तसेच संबंधित उमेदवारांना चौकशीसाठी उपस्थित राहण्यास सांगितले. दरम्यान, या प्रकरणात नवे वळण आले असून तक्रारदाराने नंतर पाठवलेल्या आणखी एका ई-मेलमध्ये यापूर्वी केलेली तक्रार खोटी असल्याचे नमूद केल्याचा दावा केला जात आहे. पुन्हा परीक्षा घेण्यात यावी, या उद्देशाने पेपरफुटीची खोटी माहिती दिल्याचे त्याने कबूल केल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे.

'शिवनाथ आयुर्वेद'चा परवाना कायमचा रद्द, अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

नाशिक : नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील जायगांव येथील डॉ मोहन पुरी यांच्या शिवनाथ आयुर्वेद प्रॉडक्ट कंपनी नावाच्या औषध निर्मिती कंपनीचा परवाना अन्न व औषध प्रशासनाने कायमचा रद्द केला आहे. डॉ. मोहन पुरी यांचे नाव संगमनेरजवळील वडगाव पान येथील कथित भोंदू राजेंद्र गडगेबाबा प्रकरणात सहआरोपी म्हणून समोर आले होते. गडगेबाबांच्या दरबारात बोगस औषधांचा पुरवठा केल्याचा आरोपही त्यांच्यावर करण्यात आला होता.

बेपत्ता तरुणीची माहिती देण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी: मोची कॉलनी, परभणी येथील जयराम बन्सीलाल कुरील यांची मुलगी सुहानी जयराम कुरील (वय 21 वर्ष, मोची गल्ली परभणी) ही दि. 23 जुलै, 2026 रोजी रात्री 03.00 वाजता कोणास काही न सांगता घरातून निघून गेली असून अद्याप घरी परत आली नाही. याप्रकरणी नानलपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या सदरील तरूणीचा रंग गोरा, चेहरा गोल लांबट, उंची 5 फुट, बांधा सडपातळ, अंगात ग्रे कलरचा टॉप व ग्रे कलरची पॅन्ट, डोळे काळे, व भाषा मराठी अवगत आहे. बेपत्ता झालेली तरुणी कुणाला आढळून आल्यास तपासीक पोलीस निरीक्षक गणेश कदम (मो. ९४२३९१०९०२) फोन क्र. (02452-220450) नानलपेठ पोलिस ठाणे, परभणी यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन तपासीक अमंलदार एस. चव्हाण यांनी केले आहे.

"शाल जोडे"

मोंढा नाका परिसरातील 'अजिंठा टोबॅको'वर FDA चा पुन्हा छापा; लाखोचा गुटखा जप्त

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शहरातील अत्यंत वर्दळीच्या समजल्या जाणाऱ्या मोंढा नाका परिसरातील जुना मोंढा नाका भागातील 'अजिंठा टोबॅको' या दुकानावर अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) पथकानेa पुन्हा एकदा धडक कारवाई केली. विशेष म्हणजे, यापूर्वी अनेकदा कारवाया होऊनही न जुमानता सुरू असलेल्या या बेकायदेशीर धंद्यावर टाकलेल्या या छाप्यात लाखो रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधी तंबाखूचा मोठा साठा हाती लागला आहे.

स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'अजिंठा टोबॅको' या दुकानावर यापूर्वी प्रशासनाकडून अनेक वेळा कारवाया झाल्या आहेत. मात्र, कायदेशीर कारवाईचा धाक न बाळगता या ठिकाणी छुप्या पद्धतीने मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित पानमसाला आणि गुटख्याची साठवणूक करून विक्री केली जात असल्याच्या तक्रारी वारंवार मिळत होत्या. याच पार्श्वभूमीवर FDA च्या पथकाने आज सापळा रचत ही अचानक कारवाई केली. शासनाने राज्यात गुटखा विक्रीवर संपूर्ण बंदी घातली असतानाही, मोंढा नाक्यासारख्या मध्यवर्ती भागात अशा प्रकारे नियम धाब्यावर बसवून अवैध व्यवसाय सुरू होता. सध्या FDA च्या पथकाकडून दुकानातील मालाची कसून तपासणी आणि पंचनाम्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते. या कारवाईमुळे शहरातील इतर अवैध गुटखा विक्रेत्यांचेही धाबे दणाणले असून, याप्रकरणी संबंधित दुकानदारावर कठोर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया जिन्सी पोलीस स्टेशन मध्ये सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

महाविद्यालयासमोर कायमची जलकोंडी; वर्षानुवर्षे तुंबणाऱ्या पाण्यावर मनपा उपाय कधी करणार?

वर्षानुवर्षे कायम असलेल्या समस्येकडे मनपाचे दुर्लक्ष; शहर बस थांब्याजवळ वाहतूक कोंडी

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

सरस्वती भुवन महाविद्यालयासमोरील मुख्य रस्त्यावर पावसाचे पाणी साचल्याने विद्यार्थी, नागरिक आणि वाहनचालकांना पाण्यातून मार्ग काढावा लागत असून वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे.

छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : शहरात अद्याप जोरदार पाऊस झालेला नसतानाही सरस्वती भुवन महाविद्यालयासमोरील मुख्य रस्त्यावर पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी प्रभावी व्यवस्था नसल्याने या ठिकाणी दरवर्षी हीच समस्या निर्माण होत असून विद्यार्थी, नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून ही समस्या कायम असतानाही महानगरपालिकेकडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सरस्वती भुवन महाविद्यालय परिसर हा शहरातील अत्यंत वर्दळीचा भाग आहे. दररोज हजारो विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी तसेच नागरिक या मार्गाचा वापर करतात. याच ठिकाणी महानगरपालिकेच्या शहर बसचा थांबा असल्यामुळे प्रवाशांचीही मोठी गर्दी असते. मात्र रस्त्यावर पाणी साचल्याने बसमध्ये चढताना आणि उतरताना विद्यार्थ्यांना व प्रवाशांना पाण्यातूनच मार्ग काढावा लागत आहे.

पाण्यामुळे रस्त्यावरील खड्डे दिसत नसल्याने दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. वाहनांचा वेग मंदावल्याने या मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी होते. चारचाकी वाहनांमुळे उडणाऱ्या पाण्याचा त्रास पादचाऱ्यांनाही सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, शहरात अद्याप मुसळधार पाऊस झालेला नसतानाही ही अवस्था आहे. पुढील काळात जोरदार पाऊस झाल्यास या परिसरात अधिक प्रमाणात पाणी साचून रस्त्याचे तळ्यात रूपांतर होण्याची शक्यता नागरिक व्यक्त करत आहेत.

स्थानिकांनी अनेकदा महानगरपालिकेकडे तक्रारी करूनही या समस्येकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे या ठिकाणी पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी स्वतंत्र पावसाळी गटार, जलवाहिनी किंवा अन्य कायमस्वरूपी तांत्रिक उपाय तातडीने राबवावेत, अशी मागणी विद्यार्थी, पालक आणि नागरिकांकडून होत आहे.

शांततापूर्ण निदर्शने हा संविधानाने दिलेला अधिकार; सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वाची टिप्पणी

नवी दिल्ली : नीट परीक्षा प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणावरून देशभर तीव्र आंदोलन पुकारण्यात आले होते. 'कॉकरोच जनता पार्टी'च्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनाची व्याप्ती वाढून हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरले होते. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी २० जुलै रोजी संसदेवर काढण्यात आलेल्या मोर्चानरम्यान परिस्थिती अत्यंत चिघळली आणि पोलिसांनी केलेल्या लाठीमारमध्ये अनेक आंदोलक विद्यार्थी तसेच काही पोलीस कर्मचारी जखमी झाले होते. या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने आंदोलकांवरील पोलिसांच्या कारवाईवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले आहेत.

आंदोलकांवर झालेल्या लाठीमारविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने या सुनावणीदरम्यान अत्यंत महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली. खंडपीठाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, "शांततापूर्ण निदर्शने करणे हा भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेला मूलभूत अधिकार आहे. जोपर्यंत आंदोलन शांततापूर्ण मार्गाने सुरू आहे, तोपर्यंत हा अधिकार कोणालाही नाकारता येणार नाही. केवळ आंदोलन सुरू आहे म्हणून पोलिसांकडून बळाचा अतिवापर किंवा हिंसक कारवाई करण्याचे समर्थन कधीही केले जाऊ शकत नाही." विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून बळाचा अतिवापर करण्यात आल्याचा आरोप करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना, पोलिसांनी केलेल्या अतिरिक्त कारवाईच्या आरोपांची स्वतंत्रपणे तपासणी व चौकशी झालीच पाहिजे, असे निर्देश न्यायालयाने दिले.

लोकसभेत सार्वजनिक परीक्षा संशोधन विधेयकावरील चर्चेदरम्यान विरोधकांचा गदारोळ

नवी दिल्ली : संसदेच्या चालू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान सोमवारी लोकसभेत एक अत्यंत महत्त्वाचा आणि ज्वलंत प्रसंग पाहायला मिळाला. 'सार्वजनिक परीक्षा (अनैतिक गैरव्यवहार प्रतिबंध) संशोधन विधेयक, २०२६' या अत्यंत संवेदनशील विषयावर चर्चा सुरू असताना विरोधी पक्षांच्या खासदारांनी जोरदार गदारोळ घातला. या सततच्या गोंधळामुळे आणि घोषणाबाजीमुळे लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी चालवणे अशक्य झाले, परिणामी पिठासीन अधिकाऱ्यांना सभा आज, म्हणजेच २८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पुन्हा सुरू करण्यासाठी स्थगित करावी लागली. संसदेचे कामकाज चालवत असताना पीठासीन अधिकारी कृष्ण प्रसाद तेन्नेती यांनी विरोधी पक्षांच्या सर्व खासदारांना वारंवार शांत राहण्याची विनंती केली; मात्र विरोधकांनी गदारोळ चालूच ठेवला. परिणामी कामकाज स्थगित करावे लागले.

ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर; चार ऑगस्टच्या यादीला ब्रेक

मुंबई : मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय राजवट संपून लवकरच लोकनियुक्त प्रतिनिधी येणार या आशेवर असलेल्यांच्या पदरी पुन्हा एकदा निराश आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने ४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीला ऐनवेळी स्थगिती दिल्याने आगामी ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. राज्यात सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेमुळे आयोगाने हा निर्णय घेतला असून, ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याच्या शक्यतांवर आता पाणी फिरले आहे.

यापूर्वीच्या नियोजित वेळापत्रकानुसार ४ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होऊन लगेचच निवडणुकीचे बिगुल वाजणार होते. या पार्श्वभूमीवर गावागावांत इच्छुक उमेदवारांनी बैठका, कॉर्नर सभा, मतदार संपर्क आणि पॅनेल बांधणीच्या हालचाली तीव्र केल्या होत्या. मात्र, मतदार याद्या दोषमुक्त आणि पारदर्शक करण्यासाठी सध्या राबवण्यात येत असलेली 'एसआयआर' मोहीम पूर्ण झाल्यानंतरच अद्ययावत विधानसभा मतदारसंघ निहाय यादी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी वापरली जावी, अशी विनंती निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती.

आयोगाने ४ ऑगस्टच्या प्रसिद्धीला दिलेल्या स्थगितीमुळे सुमारे ७५४ ग्रामपंचायतींसह राज्यातील मुदत संपलेल्या सर्वच ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया काही काळासाठी पुढे ढकलली गेली आहे. मात्र, या निर्णयामुळे मतदार यादीतील मयत, दुबार, स्थलांतरित आणि बोगस मतदारांची नावे वगळून पूर्णपणे अद्ययावत व पारदर्शक यादी हाती येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

शेतरस्ते, सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवा : तहसिलदार संदीप राजपुरे

रस्ता अडवल्यास फार्मर आयडी होणार 5 वर्षासाठी रदद

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी:-- परभणी तालुक्यातील शेतरस्ते, सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणाविरोधात महसूल प्रशासनाने ठोस भूमिका घेतली असून, सात दिवसांत अतिक्रमण न काढल्यास महसूल विभागामार्फत ते हटवून खर्च संबंधितांकडून वसूल केला जाणार आहे. अतिक्रमण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईसह शासकीय योजनांपासूनही वंचित राहावे लागू शकते, असे तहसीलदार संदीप राजपुरे यांनी स्पष्ट केले आहे.

परभणी तहसील अंतर्गत गाव नकाशावर दर्शविण्यात आलेले तसेच शासकीय जागेतील शेतरस्ते, सार्वजनिक रस्ते व ये-जा करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या मार्गावर काही व्यक्तींनी अतिक्रमण केल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा अतिक्रमणामुळे शेतकऱ्यांच्या ये-जा करण्याच्या हक्कावर परिणाम होत असून शेतीकामात अडथळे निर्माण होत आहेत.

याबाबत संबंधित अतिक्रमणधारकांना तहसीलदार कार्यालयामार्फत सदर अतिक्रमण सात दिवसांच्या आत स्वखर्चाने काढून टाकण्याची नोटीस देण्यात येणार आहे. निर्धारित मुदतीत अतिक्रमण काढून न घेतल्यास संबंधित अतिक्रमण शासन स्तरावरून महसुल विभागा मार्फत काढण्यात येईल. या कारवाईसाठी होणारा खर्च संबंधित अतिक्रमणधारकांकडून नियमानुसार वसूल करण्यात येईल.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १४३ अन्वये किंवा मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ मधील कलम ५ अन्वये इतर शेतकऱ्यांच्या ये-जा करण्याचा हक्क मान्य करण्यात आलेला आहे, अशा शेतरस्त्यांवर कोणत्याही परिस्थितीत पीक लागवड करणे, रस्ता अडविणे अथवा रस्त्याचा वापर रोखणे कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच शेतरस्त्यांचे नुकसान करणे, रस्ता बुजविणे, अतिक्रमण करणे अथवा सार्वजनिक वापरात अडथळा निर्माण करणाऱ्या संबंधित व्यक्तीविरुद्ध लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्याबाबत तरतुदी करण्यात आल्या आहेत. याशिवाय, शासनाच्या धोरणानुसार अशा प्रकारचे अतिक्रमण अथवा शेतरस्त्यांचे नुकसान करणाऱ्या व्यक्तींचे आधार कार्ड व फार्मर आयडी ५ वर्षांसाठी ब्लॉक करण्याची तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ व शासकीय मदत मिळण्यास अपात्र ठरविण्याची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकरणामार्फत करण्यात येऊ शकते.

सर्व शेतकरी व नागरिकांनी गाव नकाशावरील तसेच कायदेशीररित्या अस्तित्वात असलेल्या शेतरस्त्यांवर कोणतेही अतिक्रमण करू नये. ज्या ठिकाणी अतिक्रमण झाले असेल ते स्वयंस्फूर्तीने तात्काळ काढून प्रशासनास सहकार्य करावे. असे अवाहन तहसिलदार संदीप राजपुरे यांनी केले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी 22 हजार 425 कोटींचा विकास आराखडा

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीची मंजुरी

मुंबई : आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य आयोजनासाठी आणि पायाभूत सुविधांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने २२ हजार ४२५ कोटी ३९ लाख रुपयांच्या विकास आराखड्याला प्रशासकीय मंजुरी दिली आहे. यासंदर्भातील माहिती केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी सोमवारी लोकसभेत एका लेखी प्रश्नाच्या उत्तरात दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या उच्चस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत या आराखड्याला अंतिम मान्यता देण्यात आल्याचे राज्य सरकारने केंद्र सरकारला कळवले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन, विविध विभागांमधील समन्वय आणि धोरणात्मक निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी राज्य शासनाने विशेष त्रिस्तरीय समिती रचना अमलात आणली आहे. यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ४० सदस्यांची उच्चस्तरीय शिखर समिती गठीत करण्यात आली असून, स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून नाशिकच्या खासदारांचाही यात समावेश करण्यात आला आहे.

पिशोर पोलिसांची तत्परता; दोन अल्पवयीन मुले चाळीसगाव, छत्रपती संभाजीनगरातून सुखरूप शोधली

सीसीटीव्ही फुटेज व सोशल मीडियाच्या मदतीने अवघ्या काही तासांत शोध; पालकांच्या स्वाधीन केल्याने सुटकेचा नि:श्वास

पिशोर : घरातून कोणालाही न सांगता निघून गेलेल्या करंजखेडा येथील दोन अल्पवयीन मुलांचा पिशोर पोलिसांनी युद्धपातळीवर शोध घेत चाळीसगाव आणि छत्रपती संभाजीनगर येथून सुखरूप शोधून काढले. पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे दोन्ही मुले सुखरूप पालकांच्या स्वाधीन झाल्याने पालकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

करंजखेडा येथील मोसिन मुसा शेख (वय ३६, व्यवसाय शेती) आणि शकील खान फय्याज खान (वय ४०, व्यवसाय शेती) यांनी २७ जुलै रोजी पिशोर पोलीस ठाण्यात माहिती दिली की, त्यांची मुले अबूबकर मोसिन शेख (वय १३) आणि उमरेन शकील खान (वय १४) हे २४ जुलै रोजी कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेले आहेत.

माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने शोधमोहीम सुरू केली. पोलीस हवालदार मोरे आणि पोलीस शिपाई अन्सार पटेल यांना मुलांचा शोध घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. पोलिसांनी करंजखेडा परिसर तसेच कन्नड बसस्थानकातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये दोन्ही मुले चाळीसगावच्या दिशेने गेल्याचे स्पष्ट झाले.

यानंतर पोलिसांनी दोन्ही मुलांची शोधपत्रिका तयार करून परिसरातील पोलीस ठाण्यांसह विविध सोशल मीडिया ग्रुपवर प्रसारित केली. चाळीसगाव परिसरातील सोशल मीडिया ग्रुपवरही शोधपत्रिका मोठ्या प्रमाणात प्रसारित करण्यात आली. दरम्यान, चाळीसगाव येथील एका सोशल मीडिया ग्रुपवरून दोन्ही मुले तेथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

माहिती मिळताच पिशोर पोलिसांचे पथक तातडीने चाळीसगाव येथे रवाना झाले. तेथे उमरेन शकील खान हा सुखरूप मिळून आला. त्याच्याकडे चौकशी केली असता अबूबकर मोसिन शेख हा छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या बसने गेल्याची माहिती मिळाली.

यानंतर पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता छत्रपती संभाजीनगर बसस्थानक परिसरात मुलाच्या नातेवाईकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या. संबंधित बस बसस्थानकात पोहोचताच अबूबकर मोसिन शेख हा बसमधून उतरत असताना त्याला सुखरूप ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर दोन्ही मुलांना पिशोर पोलीस ठाण्यात आणून पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

पोलिसांच्या तत्परतेचे पालकांकडून कौतुक

दोन्ही अल्पवयीन मुले सुखरूप परत मिळाल्याने त्यांच्या पालकांनी सुटकेचा निःश्वास टाकला. पोलिसांनी वेळेचे गांभीर्य ओळखून सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्ष तपास आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर करत तातडीने शोधमोहीम राबविल्यामुळे मुले सुखरूप मिळाल्याचे सांगत पालकांनी पिशोर पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानले. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश भा. जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक, कन्नड उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार मोरे आणि पोलीस शिपाई अन्सार पटेल यांनी केली.

सं पा द की य

राम मंदिर देणगी प्रकरण आणि पारदर्शक तपासाची गरज

अयोध्या येथील जगप्रसिद्ध श्रीराम मंदिर निर्माण आणि व्यवस्थापनासाठी देश-विदेशातील कोट्यवधी भाविकांनी विश्वासाने अर्पण केलेल्या देणगीमध्ये कथित गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांची सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली गंभीर दखल अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या प्रकरणी निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी व्हावी, यासाठी उत्तर प्रदेश सरकारने लखनौ परिक्षेत्राच्या पोलीस महानिरीक्षक किरण एस यांच्या नेतृत्वाखाली नवीन विशेष तपास पथकाची (SIT) पुनर्रचना केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायमूर्तींच्या खंडपीठाने या तपासाची व्याप्ती आणि दिशा स्पष्ट करत दिलेल्या सूचना, हे भाविकांच्या श्रद्धेचे आणि सार्वजनिक पैशांच्या पारदर्शकतेचे रक्षण करण्याच्या दृष्टीने उचललेले एक आश्वासक पाऊल आहे. केवळ पोलीस अधिकाऱ्यांच्या माध्यमातून आर्थिक गैरव्यवहाराचा तपास पूर्ण होणे कठीण असते, हे लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने एसआयटीमध्ये चार्टर्ड अकाउंटंट (CA) आणि फॉरेन्सिक ऑडिटरचा समावेश करण्याचे दिलेले निर्देश अत्यंत व्यावहारिक आणि वेळेवर दिलेले आहेत. धार्मिक आणि सामाजिक संस्थांकडे येणारा निधी हा भाविकांच्या श्रद्धेशी आणि आस्थेशी थेट जोडलेला असतो. त्यामुळे अशा निधीच्या प्रत्येक रुपयाचा हिशोब पारदर्शक असणे अत्यंत अनिवार्य आहे. फॉरेन्सिक ऑडिटमुळे निधीच्या व्यवहारांमधील कोणतीही त्रुटी, हेरफेर किंवा अपहार स्पष्टपणे समोर येण्यास मदत होईल आणि तपासाला अधिक कायदेशीर व तांत्रिक बळ मिळेल. या संपूर्ण चौकशी प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखली जावी आणि कोणत्याही भेदभावाशिवाय जलदगतीने सत्य बाहेर यावे, हाच न्यायालयाचा मुख्य उद्देश आहे. दोन आठवड्यांत सादर होणाऱ्या एसआयटीच्या पहिल्या स्थिती अहवालाकडे (Status Report) आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. राम मंदिरासारख्या अथांग श्रद्धेच्या केंद्राबाबत उद्भवलेले हे प्रकरण लवकरात लवकर आणि कोणत्याही संशयाशिवाय तडीस जाणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासनाने आणि नव्या तपास पथकाने न्यायालयाच्या मार्गदर्शनाखाली निस्पृहपणे काम करून सत्याचा शोध लावावा, जेणेकरून जनतेचा आणि भाविकांचा धार्मिक संस्थांवरील विश्वास अबाधित राहील.

डिजिटल इंडिया की महागाई ग्रस्त इंडिया...?

देशातील समस्त मोबाईल धारकांचे दरमहा आर्थिक शोषण आणि कंपन्याचे पोषण, वाढत्या नेट पॅक महागाईवर शासनाच्या नियंत्रणाची गरज

आज मोबाईल हा सुविधा नसून गरज बनली आहे. शिक्षण, नोकरी, बँकिंग, आरोग्य, शासकीय सेवा सगळं ऑनलाईन झालं आहे. पण याच गरजेचा फायदा घेऊन खासगी टेलिकॉम कंपन्या दरमहा नेट पॅकच्या नावाने सर्वसामान्यांच्या खिशावर थेट भार टाकत आहेत. २०२४ च्या जुलैमध्ये १२% ते २५% पर्यंत दरवाढ झाली, आणि आता २०२५ च्या डिसेंबर ते २०२६ च्या मध्यात पुन्हा १०% ते २०% दरवाढीचा अंदाज आहे. याला "टॅरिफ रिपेअर" असं नाव दिलं जात असलं तरी वास्तवात हे सामान्य नागरिकांचं पद्धतशीर आर्थिक शोषण आहे.



१. सध्याची वास्तवस्थिती: काय बदललं?

- ***स्वस्त प्लॅन बंद*:** Jio आणि Airtel ने १GB/दिवस चे ₹२४९ चे एन्ट्री लेव्हल प्लॅन बंद केले. आता बेस प्लॅन ₹२९९ पासून सुरू होतो आणि त्यात १.५GB/दिवस मिळतो. म्हणजेच थेट १७% वाढ.

- ***गुप्त दरवाढ*:** कंपनी जाहीर घोषणा करत नाही. वेबसाईटवर दर बदलले जातात आणि रिचार्ज करताना ग्राहकाला कळतं. काही प्लॅनमध्ये जाहिरात २GB/दिवसची पण मिळतं १.५GB.

- ***पुढील दरवाढ निश्चित*:** Morgan Stanley च्या मते २०२६ मध्ये ४G/५G प्लॅनमध्ये १६-२०% दरवाढ होऊ शकते. डिसेंबर २०२५ पासून ₹१९९ चा प्लॅन ₹२२२ आणि ₹८९९ चा प्लॅन ₹१००६ होण्याची शक्यता आहे.

२. आर्थिक शोषणाचे महत्त्वाचे मुद्दे

१. *ARPU वाढवण्याचं टार्गेट*

कंपन्यांचा मुख्य उद्देश Average Revenue Per User वाढवणे आहे. स्वस्त प्लॅन हटवून ग्राहकाला महाग प्लॅन घ्यायला भाग पाडलं जातं. यामुळे Jio चा ARPU महिन्याला ₹११-१३ ने, Airtel चा ₹१०-११ ने वाढेल असा अंदाज आहे.

२. *गरीब आणि ग्रामीण वर्गावर सर्वाधिक भार*

किंमत वाढीचा सर्वाधिक फटका टियर-२, टियर-३ आणि ग्रामीण भागातील किंमत-संवेदनशील वापरकर्त्यांना बसतो. शहरी लोकांसाठी खर्च ३.२% वरून ३.६% होईल, तर ग्रामीण लोकांसाठी ५.२% वरून ५.९% होईल. म्हणजे ज्यांना उत्पन्न कमी आहे त्यांच्याकडून उत्पन्नाची मोठी टक्केवारी घेतली जाते.

३. *Dark Patterns आणि फसवणूक*

LocalCircles च्या ७४,००० लोकांच्या सर्वेक्षणात Bait & Switch, Forced Action, Subscription Trap सारखे प्रकार सर्व ३ कंपन्यांमध्ये आढळले. जास्त किमतीचे प्लॅन आधी दाखवणे, ₹१८९ चा स्वस्त पर्याय लपवणे, रद्द करता न येणारी सबस्क्रिप्शन. CCPA ने २ वर्षांत एकही नोटीस दिलेली नाही.

४. *सेवा सुधारली नाही, फक्त दर वाढले*

५G च्या नावावर गुंतवणूक होते हे खरं, पण त्याच वेळी "फ्री ५G डेटा" बंद करून तो आता महाग प्लॅनमध्येच दिला जाणार आहे. ग्राहक जास्त पैसे देतो पण दर्जात तेवढी वाढ दिसत नाही.

३. याचे सामाजिक-आर्थिक परिणाम

- ***डिजिटल असमानता वाढेल*:** शिक्षण आणि नोकरीसाठी इंटरनेट लागतो. महागाईमुळे अनेक विद्यार्थी आणि कमी उत्पन्न गट मागे पडतील.

- ***कुटुंबाचं बजेट बिघडेल*:** एका कुटुंबात ३-४ मोबाईल असतील तर दरमहा ₹१०००-₹१२०० फक्त रिचार्जवर जातात. ही रक्कम आरोग्य, अन्नावर खर्च होऊ शकते.

- ***लघु व्यावसायिक अडचणीत*:** रिक्षा, किराणा, टेलर यांसारखे UPI वर चालणारे व्यवसाय नेटशिवाय ठप्प होतात.

४. नियंत्रणासाठी काय करणे गरजेचे?

१. *TRAI ने कठोर हस्तक्षेप करावा*

RBI, SEBI, IRDAI प्रमाणे TRAI ने Dark Patterns बंद करण्यास भाग पाडावे. दरवाढीपूर्वी सार्वजनिक सुनावणी बंधनकारक करावी.

२. *किमान बेसिक प्लॅन अनिवार्य*

₹१४९-₹१९९ च्या रेंजमध्ये १GB/दिवस आणि अमर्यादित कॉल्स असलेला सामाजिक बेस प्लॅन सरकारने अनिवार्य करावा. BSNL ला यासाठी बळ द्यावे.

३. *पारदर्शकता*

कोणताही प्लॅन बदलल्यास ३० दिवस आधी SMS आणि वेबसाइटवर स्पष्ट माहिती द्यावी. "रॅक रेट" ४ पैसे/१०KB सारखे लपले दर रद्द करावेत.

४. *ग्राहक जागरूकता*

वापरकर्त्यांनी दीर्घ मुदतीचे प्लॅन, फॅमिली प्लॅन आणि BSNL सारखे पर्याय तपासावेत. दरमहा ऑटो-रिचार्ज बंद करून गरजेनुसार रिचार्ज करावा.

५. *स्पर्धा टिकवणे*

एकाधिकार होऊ नये म्हणून BSNL ला ४G/५G मध्ये सक्षम करणे आणि नवीन खेळाडूंना स्पेक्ट्रम स्वस्तात देणे गरजेचे आहे.

निष्कर्ष

डेटा स्वस्त झाला म्हणून भारतात डिजिटल क्रांती झाली. आता त्याच डेटाला महाग करून त्या क्रांतीचे फळ फक्त कंपन्यांच्या नफ्यात जमा होत आहे. २०१९ पासून Jio चा ARPU जवळपास दुप्पट झाला आहे. ही प्रगती नाही, तर शोषण आहे.

मोबाईल ही आता मूलभूत सुविधा आहे. त्यामुळे अन्न, पाणी, वीजप्रमाणे यावरही नियंत्रण यंत्रणा हवी. अन्यथा "डिजिटल इंडिया" हे फक्त "महागडा इंडिया" बनून राहील.

लेखक- विश्वास बळीराम गायकवाड पत्रकार
बोरघर माणगांव रायगड
महाराष्ट्र ९८२२५८०२३२*

वेरूळ-घृष्णेश्वर मंदिर परिसरात जागतिक दर्जाची स्वच्छता राखणार; विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जागतिक प्रसिद्ध वेरूळ-घृष्णेश्वर मंदिर परिसरात देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक आणि भाविक सतत भेट देत असतात. आगामी कालावधीत होऊ घातलेल्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या परिसरात भाविकांची आणखी मोठी गर्दी होण्याचा अंदाज आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर वेरूळ-घृष्णेश्वर येथे जागतिक दर्जाची स्वच्छता राखणे ही केवळ प्रशासनाची नव्हे तर सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे. पर्यटकांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच या परिसरात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे संबंधित सर्व यंत्रणांनी उत्तम समन्वय साधून योग्य व्यवस्थापन करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले आहेत. वेरूळ-घृष्णेश्वर मंदिर परिसरातील विकास आराखडा आणि येथील स्वच्छतेच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात एका उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., अपर आयुक्त (विकास) सुषमा देसाई यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, घृष्णेश्वर मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ग्रामपंचायत तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. बैठकीदरम्यान उपस्थित अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागाशी संबंधित विविध सूचना आणि मते मांडली. यावेळी बोलताना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले की, वेरूळ-घृष्णेश्वर मंदिर परिसरात भाविक व पर्यटकांची कायमच मोठी वर्दळ असते. त्यामुळे तेथे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी 'घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026' ची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच, घनकचऱ्याच्या योग्य व्यवस्थापनासाठी या परिसरात एक अत्याधुनिक कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यात यावे, यासाठी तातडीने सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित यंत्रणांना यावेळी दिले. पर्यटक, भाविक, व्यावसायिक तसेच सणासुदीच्या किंवा गर्दीच्या काळात मोठ्या प्रमाणावर निर्माण होणारा कचरा वेळीच उचलला जावा, यासाठी अतिरिक्त मनुष्यबळाचा वापर करावा, अशा सक्त सूचनाही त्यांनी दिल्यात. कचरा व्यवस्थापनासोबतच संपूर्ण परिसराचे सुशोभीकरण करणे, नागरिकांमध्ये आणि व्यावसायिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करणे आणि नियम न पाळणाऱ्यांवर कठोर दंडात्मक उपाययोजना राबवणे यावरही भर देण्यात आला. कचरा व्यवस्थापनाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी कचऱ्याचे उगमस्थानीच ओला व सुका कचरा असे वर्गीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. कचऱ्यापासून पुनर्वापराच्या वस्तूंची निर्मिती करण्याच्या प्रक्रियेला प्रोत्साहन दिले जावे, जेणेकरून पर्यावरणपूरक वातावरण तयार होईल. या संपूर्ण स्वच्छता मोहिमेत आणि पुनर्वापराच्या उपक्रमांमध्ये महिला बचत गटांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढवावा, जेणेकरून महिलांना रोजगाराची संधी मिळण्यासोबतच स्थानिक विकासही साधता येईल, असे महत्त्वाचे मार्गदर्शन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले. वेरूळच्या या ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळाचे पावित्र्य व सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी यापुढे जागतिक दर्जाची स्वच्छता राखणे आवश्यक आहे. या उद्देशाची पूर्ती करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन करत, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी यावेळी बैठकीत उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना व पदाधिकाऱ्यांना स्वच्छतेची सामूहिक प्रतिज्ञा दिली.

वृक्ष संवर्धन करणे महत्त्वाचे; मानवाच्या जीवनातील सांस्कृतिक ,सामाजिक व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा समन्वय साधण्यासाठी जि.प.शाळेचे एक पाऊल

जालना : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निपाणी पिंपळगाव केंद्र राणी उंचेगाव तालुका घनसावंगी या शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक व गावकरी यांनी आषाढी एकादशी निमित्त गावातून वृक्ष दिंडी ,वारकरी दिंडी व ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडी मध्ये विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवडीचे महत्त्व सांगणारे फलक घेऊन ..

वृक्ष लागवड केल्याने आपल्याला होणारा फायदा,

वृक्षापासून मिळणारे फळे, औषधी वनस्पतीचे महत्व व यापासून मिळणारा ऑक्सिजन, रसाळ फळे, सुगंधी फुले वेगवेगळ्या कामात उपयोगी येणाऱ्या वस्तू, यांचे महत्त्व गावकऱ्यांना, पालकांना समजावून सांगितले , यामध्ये गावकऱ्यांनी वृक्षारोपणामध्ये सहभाग घेतला,

तसेच घोषणा देऊन वृक्षदिंडीचे महत्त्व गावाला समजावून सांगितले . यावेळी दिंडीच्या समाप्तीनंतर उपस्थितांच्या हस्ते शाळेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले . या दिंडी सोहळ्यात निपाणी पिंपळगांव गावातील भाविक भक्त तसेच महिला व तरुण यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ढोल ,टाळ ,मृदुंग ,वाद्य, स्पीकर लेझीम, नृत्य, या कला गुणांमध्ये गावकरी सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाच्या शेवटी शालेय पारिससात वृक्षारोपण करण्यात आले ...तसेच गावातील वयोवृद्ध व भजनी मंडळ यांनी ज्ञानोबा तुकारामाचे नामस्मरण करत भजन, फुगडीचा ,आनंद घेतला . या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री राजेश सदावर्ते सर ,श्री काळे सर, श्रीमती आगळे मॅडम ,श्री घुले सर ,श्री सातपुते सर, श्री मस्के सर व श्रीमती खेडकर मॅडम यांनी परिश्रम घेतले .या कार्यक्रमाला गावातील सरपंच ,उपसरपंच ,माजी सरपंच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोपाळ ढेंबरे व सदस्य पालक भाविक भक्त उपस्थित होते .

राजकुंवर विद्यालयात दुमदुमला विठूनामाचा गजर!

चिमुकल्या वारकऱ्यांची दिंडी अन् सोबत पर्यावरण रक्षणाचा संदेश

फर्दापूर (प्रतिनिधी): महाराष्ट्राची महान संस्कृती असलेल्या वारकरी परंपरेचा अनोखा जागर फर्दापूर येथील राजकुंवर विद्यालयात पाहायला मिळाला. आषाढी एकादशीच्या पवित्र निमित्ताने विद्यालयात चिमुकल्या विद्यार्थ्यांची एक भव्य आणि भक्तिमय दिंडी आयोजित करण्यात आली होती. या दिंडीतून केवळ भक्तीच नाही, तर पर्यावरण संवर्धनाचा अत्यंत महत्त्वाचा संदेशही समाजात देण्यात आला.

या भक्तिमय कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण:

चिमुकल्या संतांची मनमोहक वेशभूषा:* या दिंडीत शाळेतील लहानग्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि वारकऱ्यांची पारंपरिक वेशभूषा साकारली होती. डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात भगवी पताका आणि कपाळावर गंध लावलेल्या या चिमुकल्या वारकऱ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले}].

भक्तीसोबतच सामाजिक प्रबोधन: वारकरी संप्रदायाने नेहमीच समाजप्रबोधनाचे काम केले आहे, तोच वसा या विद्यार्थ्यांनी पुढे चालवला. दिंडीत चालताना विद्यार्थ्यांनी हातात विविध फलक धरले होते. त्याद्वारे "स्वच्छता राखा", "झाडे लावा, झाडे जगवा", "पर्यावरण वाचवा" आणि "एकता व सामाजिक सलोखा जपा" असे महत्त्वपूर्ण संदेश देऊन जनजागृती केली}].

टाळ-मृदंगाचा गजर आणि रिंगण सोहळा: 'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषात आणि टाळ-मृदंगाच्या तालावर ही पायी दिंडी काढण्यात आली. विशेष म्हणजे, पंढरपूरच्या वारीत होणाऱ्या 'पारंपरिक रिंगण सोहळ्याचा' थरारही या विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहात साजरा केला.

संस्कारांची शिदोरी: या स्तुत्य उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ भारतीय संस्कृती आणि वारकरी संप्रदायाची ओळखच झाली नाही, तर सामाजिक बांधिलकी आणि निसर्ग संवर्धनाचे प्रत्यक्ष धडेही मिळाले.

उपस्थिती व मार्गदर्शन: हा दिमाखदार कार्यक्रम विद्यालयाचे मुख्याध्यापक *प्रा. डॉ. ए. जे. बेडवाल* यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी शाळेतील शिक्षिका सपकाळ मॅडम, शिंदे मॅडम, मानकर मॅडम, पोळ मॅडम, राऊत, सोनवणे, घायवट मॅडम यांच्यासह सर्व प्राथमिक शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वच्छ सर्वेक्षण -२०२६; परभणी जिल्ह्याला उत्कृष्ट स्थान मिळण्यासाठी स्वच्छता निकषांची अंमलबजावणी करावी : पालकमंत्री मेघना बोर्डीकर

हिंदु प्रकाश वार्ता. प्रतिनिधी

परभणी : स्वच्छ भारत मिशन (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण-2026 च्या अनुषंगाने पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी महापालिका व जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायतींना स्वच्छतेसंदर्भातील सर्व निकषांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

शहरांमध्ये दृश्यमान स्वच्छता, घराघरातून शंभर टक्के कचरा संकलन, घनकचरा व्यवस्थापन, सार्वजनिक स्वच्छतागृहांची नियमित देखभाल, प्लास्टिक निर्मूलन, जनजागृती, नागरिकांचा सहभाग आणि दैनंदिन प्रगतीचा आढावा या बाबींवर विशेष भर देत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने नियोजनबद्ध व परिणामकारक कार्यवाही करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्वच्छ सर्वेक्षण-2026 मध्ये परभणी जिल्ह्याला उत्कृष्ट स्थान मिळवून देण्यासाठी महापालिका व सर्व नगरपरिषद, नगरपंचायती, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी एकत्रितपणे सहभाग नोंदवून स्वच्छतेच्या सर्व सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी गुरुवारी (ता. २३) दूरदृश्यप्रणालीद्वारे महापालिका, जिल्ह्यातील सर्व पालिकांच्या

स्वच्छता व्यवस्थेचा आढावा घेतला. मुख्य निर्देश पुढीलप्रमाणे देण्यात आले.

दृश्यमान स्वच्छता - शहरातील प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा, सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यालय परिसर आणि पर्यटनस्थळे कायमस्वरूपी स्वच्छ ठेवावीत. रस्त्यांवर कचरा साचणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच उघडे कचरा डेपो व कचऱ्याचे ढिगारे तात्काळ हटवावेत.

घराघरातून कचरा संकलन - शंभर टक्के घरांमधून दररोज ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करावा. व्यापारी आस्थापनांकडूनही नियमित कचरा संकलनाची व्यवस्था सुनिश्चित करावी.

सार्वजनिक स्वच्छतागृहे - सर्व सार्वजनिक व सामुदायिक स्वच्छतागृहे स्वच्छ, कार्यरत आणि वापरण्यायोग्य ठेवण्याबरोबरच पाणी, वीज, स्वच्छता साहित्य व नियमित देखभाल उपलब्ध ठेवावी.

घनकचरा व्यवस्थापन - ओला व सुका कचरा वेगळा करून त्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करावी. कचऱ्याची उघड्यावर जाळपोळ होणार नाही याची दक्षता घ्यावी. जुन्या कचरा डेपोचे निर्मूलन व पुनर्विकासाची कार्यवाही गतीने पूर्ण करावी.

जनजागृती उपक्रम - नागरिक, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालये, व्यापारी संघटना व महिला बचत गट यांच्या सहभागातून व्यापक जनजागृती राबवावी. स्वच्छता शपथ, रॅली, स्वच्छता अभियान, भित्तीचित्रे आणि सोशल मीडियाद्वारे जनजागृती करावी.

विशेष स्वच्छता मोहीम - दररोज सकाळी विशेष स्वच्छता मोहीम राबवून नाले, गटारे, बाजारपेठा व सार्वजनिक ठिकाणांची नियमित स्वच्छता करावी.

प्लास्टिक निर्मूलन - एकेरी वापराच्या प्लास्टिकविरोधात विशेष मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी.

नागरिकांचा सहभाग - नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करून स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्थांच्या सहभागातून स्वच्छता अभियान अधिक प्रभावी करावे.

दैनंदिन आढावा व अहवाल – महापालिका आयुक्त आणि मुख्याधिकाऱ्यांनी दररोज स्वच्छता कामांचा प्रत्यक्ष आढावा घ्यावा. सर्व कामांचे छायाचित्रांसह दस्तऐवजीकरण करून दररोज सविस्तर प्रगती अहवाल संबंधित कार्यालयाकडे सादर करावा.

एईएसएलला आंध्र प्रदेशात सुमारे 8,500 कोटी रुपयांचा ट्रान्समिशन प्रकल्प मिळाला

अहमदाबाद, 25 जुलै 2026: भारतातील सर्वात मोठी खासगी ट्रान्समिशन आणि वितरण कंपनी तसेच जागतिक स्तरावर विविध क्षेत्रांत कार्यरत अदाणी समूहाचा भाग असलेल्या अदाणी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड (AESL) ने आज जाहीर केले की, कंपनीला आंध्र प्रदेशातील सुमारे 8,500 कोटी रुपयांचा आंतरराज्यीय ट्रान्समिशन प्रकल्प मिळाला आहे. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम (विझाग) परिसरातील प्रस्तावित ग्रीन हायड्रोजन आणि ग्रीन अमोनिया प्रकल्पांसाठी वीज प्रसारण व्यवस्था (पहिला टप्पा)" हा प्रकल्प भारत सरकारच्या टॅरिफ-आधारित स्पर्धात्मक निविदा (TBCB) प्रक्रियेद्वारे मंजूर करण्यात आला असून, या निविदेत एईएसएलने सर्वात स्पर्धात्मक बोली लावून हा प्रकल्प मिळवला आहेही ट्रान्समिशन व्यवस्था विशाखापट्टणम (विझाग) परिसरातील प्रस्तावित ग्रीन हायड्रोजन आणि ग्रीन अमोनिया प्रकल्पांना वीज जोडणी आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी उभारली जाणार आहे. या प्रकल्पाद्वारे सुमारे 4,500 मेगावॅट वीज मागणी पूर्ण केली जाईल. तसेच, पेंडुर्थी–विझाग परिसरात उभारल्या जात असलेल्या नवीन डेटा सेंटर्स आणि डिजिटल पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे वाढणारी वीज मागणी पूर्ण करण्यासही हा प्रकल्प मदत करेल.

हवाई निगराणी कार्यक्रमासाठी डीआरडीओसोबत भागीदारी

मुंबई - अदाणी डिफेन्स अँड एरोस्पेस आणि डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (डीआरडीओ) यांनी भारतीय वायुसेनेसाठी (IAF) पुढील पिढीच्या एअरबोर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल कार्यक्रमासाठी महत्त्वपूर्ण करार केला आहे. ही भागीदारी 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला अधिक बळ देणारी आहे.या करारानुसार, अदाणी डिफेन्स अँड एरोस्पेस आणि डीआरडीओ मिळून भारतीय वायुसेनेसाठी सहा सुधारित एअरबस A321 विमानांवर अत्याधुनिक एअरबोर्न मिशन सिस्टीम विकसित करणार, तयार करणार आणि त्यांचे एकत्रीकरण (इंटिग्रेशन) करणार आहेत. या प्रकल्पात पुढील 30 वर्षांसाठी देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉल (MRO), तांत्रिक सहाय्य आणि इंटिग्रेटेड लॉजिस्टिक सपोर्ट यांचाही समावेश आहे. 2032-33 पर्यंत AEW&C-MKII विमान भारतीय वायुसेनेत दाखल करण्याचे नियोजन आहे.

टोयोटा किर्लोस्कर मोटरने आरोग्य सुविधा अधिक मजबूत केल्या आहेत

छत्रपती संभाजीनगर, 24 जुलै 2026: टोयोटा किर्लोस्कर मोटर ने आज महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील बिडकीन येथील कम्युनिटी हेल्थ सेंटर) मध्ये आरोग्य पायाभूत सुविधा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्याची घोषणा केली. आरोग्य व स्वच्छता यावर केंद्रित असलेल्या आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (उपक्रमाचा एक भाग म्हणून, टीकेएम ने या आरोग्य केंद्रात आवश्यक वैद्यकीय उपकरणे पुरवली व बसवली आहेत. या उपक्रमाचा लाभ पैठण तालुक्यातील 70,000 हून अधिक नागरिकांना होणार आहे. पैठण तालुका सुमारे 3.8 लाख लोकसंख्येला सरकारी आरोग्य सुविधांच्या नेटवर्कद्वारे सेवा पुरवतो. या भागात मातृत्व व बाल आरोग्य सेवा, आपत्कालीन प्रतिसाद सेवा आणि प्राथमिक आरोग्य सेवांची मागणी वाढत आहे. या महत्त्वाच्या आरोग्य गरजा लक्षात घेऊन टोयोटा किर्लोस्कर मोटरने सीएचसी बिडकीनला सर्वसमावेशक वैद्यकीय उपकरणे पुरवून सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा मजबूत केल्या आहेत आणि दर्जेदार आरोग्य सेवांपर्यंत पोहोच सुधारली आहे.

गॅलेक्सी झेड सिरीज प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध

गुरुग्राम - सॅमसंगने घोषणा केली आहे की, त्यांची नवीन फोल्डेबल गॅलेक्सी झेड सिरीज आता भारतात प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध आहे. या श्रेणीमध्ये सर्वोत्तम कंटेंट वापरासाठी गॅलेक्सी झेड फोल्ड८, प्रगत उत्पादकता व निर्मितीसाठी गॅलेक्सी झेड फोल्ड८ अल्ट्रा, आणि सॅमसंगचे आजवरचे सर्वात स्लिम फ्लिप डिवाईस गॅलेक्सी झेड फ्लिप८ यांचा समावेश आहे. फोल्डेबल इनोव्हेशनच्या सात पिढ्यांवर आधारित ही सिरीज गॅलेक्सी एआयद्वारे संचालित आहे, ज्यामध्ये पारदर्शकता, गोपनीयता आणि वापरकर्त्यांचे नियंत्रण कायम ठेवून कमी स्टेप्समध्ये टास्क्स पूर्ण करण्यास मदत करण्यासाठी जेमिनी इंटेलिजन्सचा समावेश आहे."गेल्या सात पिढ्यांपासून आमच्या फोल्डेबल स्मार्टफोन्सना मिळालेला प्रतिसाद सॅमसंगचे या श्रेणीतील नेतृत्व पुन्हा एकदा सिद्ध करतो, ज्याची सुरुवात आम्हीच केली होती.

एचडीएफसी बँकेची आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये दमदार कामगिरी

मुंबई: भू-राजकीय तणाव, व्यापारातील अडथळे आणि बाजारातील अस्थिरतेमुळे जागतिक अर्थव्यवस्थेसमोर आव्हाने असतानाही एचडीएफसी बँकेने आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये मजबूत आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. देशांतर्गत मागणीतील लवचिकता, विवेकी जोखीम व्यवस्थापन, तंत्रज्ञान-आधारित परिवर्तन आणि मजबूत कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या बळावर बँकेने प्रमुख व्यावसायिक निर्देशांकांमध्ये उल्लेखनीय वाढ साध्य केली.बँकेच्या कर्जवाटपात वर्ष-दर-वर्ष 12.1 टक्क्यांनी वाढ होऊन ते ₹29.37 लाख कोटींवर पोहोचले, तर एकूण ठेवींमध्ये 14.4 टक्क्यांची वाढ होऊन त्या ₹31.05 लाख कोटींवर गेल्या. ही वाढ संपूर्ण बँकिंग क्षेत्रातील ठेवींच्या वाढीपेक्षा अधिक होती. बँकेचे निव्वळ उत्पन्न ₹1.91 लाख कोटींवर पोहोचले, तर करानंतरचा नफा 10.9 टक्क्यांनी वाढून ₹74,671 कोटी झाला. बँकेचा एकूण बॅलन्स शीट 11.6 टक्क्यांनी वाढून ₹43.65 लाख कोटींवर पोहोचला, ज्यातून सातत्यपूर्ण व्यावसायिक गती आणि उत्तम मालमत्ता गुणवत्ता दिसून येते.

सद्गुरु अक्का महाराज श्री क्षेत्र मायंबा ते श्री क्षेत्र वेरूळ कावड यात्रा उत्साहात

गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला 50 हून अधिक कावडधारकांचे वेरूळ नाथ आश्रम येथे आगमन

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी : श्री क्षेत्र मायंबा (सावरगाव) ते श्रीक्षेत्र वेरूळ या १७० किलोमीटरच्या खडतर मार्गावर निघालेली भव्य कावड यात्रा अवघ्या चार दिवसांचा प्रवास पूर्ण करून २८ जुलै रोजी (मंगळवार) श्रीक्षेत्र वेरूळ येथे मोठ्या थाटामाटात दाखल होत आहे. वेरूळ येथील नाथाश्रमाच्या मठाधिपती सद्गुरू अक्काताई महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाने आणि श्री चैतन्य मच्छिंद्रनाथ भगवान यांच्या कृपाशीर्वादाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या २५ जुलै (शनिवार) रोजी श्रीक्षेत्र मायंबा येथून यात्रेचा अतिशय उत्साहात प्रारंभ झाला होता. "सद्गुरू अक्काताई महाराज की जय!" आणि "मच्छिंद्रनाथ भगवान की जय!" असा जयघोष करत, ढोल-ताशांच्या गजरात व टाळ-मृदंगाच्या तालावर ही कावड यात्रा पुढे मार्गस्थ झाली. या यात्रेत ५० पेक्षा अधिक नाथभक्त खांद्यावर पवित्र कावड घेऊन सहभागी झाले आहेत. गुरुपौर्णिमेच्या या पावन पर्वावर ही यात्रा वेरूळ येथे पोहोचत असल्याने सर्व नाथभक्तांमध्ये एक वेगळाच आनंद आणि उत्साह संचारला आहे.

ठिकठिकाणी भव्य स्वागत आणि अन्नदान

१७० किलोमीटरच्या या संपूर्ण प्रवासात ठीकठिकाणी स्थानिक ग्रामस्थ आणि भाविकांकडून कावडधारकांचे अत्यंत जल्लोषात स्वागत करण्यात आले. प्रवासादरम्यान भजन, कीर्तन, आरती आणि नाथ संप्रदायाच्या पारंपरिक मंत्र आणि गाण्यांनी संपूर्ण मार्ग भक्तिमय झाला होता. यात्रेकरूंच्या दुपारच्या विश्रांतीच्या आणि रात्रीच्या मुक्कामाच्या ठिकाणी स्थानिक भक्तांकडून चहापान, फराळ आणि महाप्रसादाची (अन्नदान) उत्तम सोय करण्यात आली होती.

नाथ संप्रदायाची परंपरा आणि धार्मिक महत्त्व

* **कावड यात्रेचे महत्त्व:** नाथ संप्रदायात कावड यात्रेला अत्यंत पवित्र स्थान आहे. ही केवळ एक पदयात्रा नसून ती शरीराची आणि मनाची तपश्चर्या आहे. पवित्र तीर्थक्षेत्रातून जल किंवा कावड वाहून आणून ईश्वराला आणि गुरूंच्या चरणी अर्पण करणे म्हणजे स्वतःचे अहंकार समर्पित करण्याचे प्रतीक मानले जाते.

* **भिक्षेचे महत्त्व:** कावड यात्रेदरम्यान नाथभक्त भिक्षा मागण्याची प्राचीन परंपरा पाळतात. भिक्षा मागणे हे साधकातील 'मी'पणा व अहंकार नष्ट करण्याचे साधन आहे. यातून साधकाला नम्रता आणि ईश्वरचिंतनाची शिकवण मिळते.

* **अन्नदानाचे महत्त्व:** नाथ परंपरेत 'अन्न हे पूर्णब्रह्म' मानले गेले आहे. कावडधारकांना आणि साधकांना अन्नदान करणे हे अत्यंत पुण्यकारक मानले जाते. या यात्रेच्या निमित्ताने हजारो भक्तांना सेवा आणि अन्नदानाचा लाभ मिळतो.

* **नाथ संप्रदायाचा इतिहास:** नाथ संप्रदाय हा भारतातील एक अत्यंत प्राचीन आणि सिद्ध परंपरा असलेला संप्रदाय आहे. नवनाथांपैकी प्रथम नाथ श्री नवनाथ/मच्छिंद्रनाथ भगवान आणि श्री गोरक्षनाथ यांनी या परंपरेचा प्रचार व प्रसार केला. योगसाधना, जनसेवा, सर्वसमावेशकता आणि ईश्वरी भक्ती हे या संप्रदायाचे मुख्य अधिष्ठान आहे. महाराष्ट्राच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत नाथ संप्रदायाचे योगदान अतुलनीय आहे.

चार दिवसांचा हा भक्तिमय प्रवास पूर्ण करून २८ जुलै रोजी श्रीक्षेत्र वेरूळ येथील नाथ आश्रम यात्रेचा मुख्य सोहळा पार पडणार असून, दर्शनासाठी आणि कावड यात्रेच्या स्वागतासाठी अक्काताई महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत . व नाथ भक्त मंडळ विवेक चव्हाण प्रकाश वाकळे माजी सरपंच प्रकाश ह भ प नारायण भांबर्डे संतोष करपे पाटील कैलास मिसाळ सतीश लोखंडे मते मामा श्रीमती कल्पना कदम . दामू अण्णा गवळी प्रताप भोसले यांच्यासह महाराष्ट्रभरातील नाथ भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थित असतो

गुरु पूर्णिमा सोहळा वेरूळ येथे होणार

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी : श्री क्षेत्र वेरूळ येथील महाराष्ट्रातील संत परंपरेतील थोर संत ब्रह्मलीन जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज यांची कर्मभूमी असलेले श्रीक्षेत्र वेरूळ येथे त्यांनी स्थापित केलेल्या श्री संत जनार्दन स्वामी आश्रम परिसरामध्ये दि २९ गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने महाराष्ट्रभरातून परमपूज्य बाबाजींच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लाखो भाविकांची उपस्थिती राहणार असून उत्तर अधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या शुभहस्ते व उपस्थितीमध्ये लाखो भाविकांच्या सहभागाने सकाळी आठ वाजता बाबाजींच्या पादुकांची सहवाध्य मिरवणूक संपन्न होईल

त्यानंतर कार्यक्रम स्थळी बरोबर दहा वाजता बाबाजींच्या पादुकांचे पाद्य पूजन संपन्न होईल याप्रसंगी आश्रमीय सर्व साधुसंत व परमपूज्य बाबाजींना गुरुस्थानी मानणारे राजकीय व सामाजिक जीवनातील महत्त्वपूर्ण पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे गुरु पौर्णिमा निमित्त परमपूज्य बाबाजींनी स्थापित केलेल्या गुरुकुला मधील हजारो विद्यार्थ्यांचे संस्कार शिबिराचे आयोजन दि २७ तारखेपासून ते दि ३ तारखेपर्यंत या संस्कार शिबिराचा आयोजन केलेला आहे (यावर्षी गुरु पौर्णिमा सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज यांची पंचधातूची २१ फूट उंचीची मूर्ती बनवण्याचा संकल्प जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांनी केला असून एवढ्या उंचीची भारतातील बाबाजींची सर्वात मोठी मूर्ती गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने गुरुदक्षिणा म्हणून अर्पण होणाऱ्या आर्थिक योगदानातून परमपूज्य बाबाजींची मूर्ती तयार होणारा असल्याची माहिती जय बाबाजी परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी दिली

जनतेच्या समस्यांवर तातडीने कार्यवाही; लोकसंपर्क उपक्रमास प्रतिसाद

अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड येथे पंचायतसमिती कार्यालयात आयोजित लोकसंपर्क उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तालुक्यातील ५०० हून अधिक नागरिकांनी विविध शासकीय योजनांशी संबंधित अडीअडचणी, तक्रारी व मागण्या मांडल्या. प्रत्येक नागरिकाशी वैयक्तिक संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

बैठकीदरम्यान घरकुल, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी, गाय गोठा व वैयक्तिक सिंचन विहीर योजनेच्या लाभासाठी पैसे मागितले जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या. यावर संबंधित अधिकाऱ्यांना कठोर शब्दांत समज देत शासकीय योजनांमध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार किंवा लाभार्थ्यांची अडवणूक खपवून घेतली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा दिला.

नागरिकांनी मांडलेले सर्व प्रश्न येत्या सोमवार पर्यंत प्राधान्याने मार्गी लावून त्याबाबतचा अहवाल पुढील लोकसंपर्क बैठकीत सादर करण्याचे निर्देशही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

जनतेच्या समस्या एकाच ठिकाणी ऐकून त्यांचे जलद व प्रभावी निराकरण करण्यासाठी हा लोकसंपर्क उपक्रम दर सोमवारी सिल्लोड व शुक्रवारी सोयगाव येथे नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

आषाढी निमित्त जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथील बालकरकऱ्यांची निघाली वारी

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२७ जुलै : आषाढी एकादशी निमित्ताने सोयगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथील बालवारकर्याची वारी शाळे पासून आमखेडा येथील विठ्ठल रूख्मिणी मंदीरा पर्यंत काढण्यात आली होती.या वारी मध्ये विठ्ठलाची वेशभुषा कु.निकुंभ खशी व कु.योगीता बोलखेडे व रुख्मिणी मातेच्या वेशभूषेत कु.मनश्री गाजरे कु.प्रतीक्षा राऊत यांनी सुंदर अशा वेशभुषा परीधान केल्या होत्या. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये विद्यार्थीनीनी विठ्ठल भक्त गोरा कुंभार याच्यावरील नाटीका सादरीकरण करून तसेच विठ्ठल रूख्मिणी मंदीरावर विठ्ठल भक्तीची गाण्यावर नृत्य सादरी करणकरून उपस्थित भक्तगणाचे मन जिकंली याच बरोबर विद्यार्थी गळ्यात टाळ डोक्यावर टोपी, तर विद्यार्थीनी पातळ परीधान करून बालकरी याच्या वेशभुषा परीधान केल्या होत्या.यावेळी विठ्ठल नामात शाळेचा व मंदीराचा परीसर भरावून गेला होता यावेळी शालेय व्यवस्थापन समाती अध्यक्ष भगवान सोनवणे याच्यासह मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सुरेखा चौधरी, मंगला बोरसे,रामचंद्र महाकाळ,गणेश बाविस्कर,प्रतिभा कोळी,सविता पाटील,अकुश काळे,अनिल देसाई,विवेक महाजन,तानाजी देसाई,शुभम देसले,पुनम लाड यानी परिश्रम घेतले.

अलिबागच्या किनाऱ्यावर रायगड पोलिसांची धडक कारवाई

4 कोटींचे 'व्हेल उल्टी'सदृश ॲम्बरग्रीस जप्त, आरोपी वनविभागाच्या ताब्यात

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

बोरघर माणगांव रायगड : सागरी सुरक्षा आणि किनारपट्टीवरील अवैध व्यवहारांवर करडी नजर ठेवणाऱ्या रायगड पोलिसांनी अलिबागमध्ये मोठी कारवाई करत सुमारे ४ कोटी रुपये बाजारभाव असलेला संरक्षित व्हेल जातीचा 'ॲम्बरग्रीस' जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीमती ऑचल दलाल यांच्या मार्गदर्शनानुसार आणि अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय अधिकारी माया मोरे तसेच पोलीस निरीक्षक प्रविण पांडे यांच्या सूचनेनुसार अलिबाग पोलीस ठाण्याचे विशेष गस्त पथक २६/२७ जुलैच्या रात्री नाईट राऊंडवर होते.

दिनांक २७ जुलै रोजी पहाटे १.३० वाजण्याच्या सुमारास मौजे चाळमाळा येथील जेट्टीजवळ स्कुटी क्र. MH 06 BZ 6341 वर संशयास्पदरित्या घिरट्या घालणाऱ्या एका इसमाला होमगार्ड आणि गस्त पथकाने थांबवले. चौकशीत त्याने नाव राहुल पंढरीनाथ हातणी, वय ३३, रा. चाळमाळा, पो. थळ, ता. अलिबाग असे सांगितले.

त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने अंगझडती आणि स्कुटीची तपासणी केली असता डिक्कीमधील कापडी पिशवीत सुमारे ४ किलो वजनाचा व्हेल जातीच्या संरक्षित वन्यजीवाचा उल्टीसदृश पदार्थ मिळून आला. त्याची अंदाजे बाजारभावानुसार किंमत ४,००,००,००० रुपये इतकी आहे. सोबत २५,००० रुपये किमतीची स्कुटीही जप्त करण्यात आली. एकूण ४,००,२५,००० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ नुसार ॲम्बरग्रीस बाळगणे, वाहतूक करणे आणि विक्री करणे हा गंभीर गुन्हा असल्याने पंचनामा करून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. पुढील तपासासाठी आरोपी व मुद्देमाल वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी, अलिबाग यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

ही कारवाई सहा. पोलीस उपनिरीक्षक संतोष पाटील, पोहवा अजित देशमुख, नितेश वरसोलकर आणि होमगार्ड अनिल राठोड, करण नागावकर, जगदिश पवार, भालचंद्र पाटील यांच्या पथकाने केली.

जनतेला आवाहन

पोलिसांनी जनतेला आवाहन केले आहे की समुद्रकिनारी किंवा इतरत्र कुठेही व्हेल माशाची उल्टीसदृश वस्तू आढळल्यास ती स्वतःकडे बाळगू नये. तात्काळ जवळच्या पोलीस ठाणे किंवा वनविभाग रायगड यांना माहिती द्यावी.

रायगड पोलिसांच्या या सतर्कतेमुळे आणि त्वरित कारवाईमुळे किनारपट्टीवरील अवैध तस्करीला मोठा चाप बसला आहे.

सोयगाव; हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत; एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत जि.प.प्राथमिक शाळा रामजीनगर येथे वृक्षारोपण उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२७ जुलै : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे हरित महाराष्ट्र उपकरणे अंतर्गत 'एक पेड माँ के नाम' याद्वारे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या प्रारंभी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.त्यानंतर मुख्याध्यापक,शिक्षक,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य,पालक व विद्यार्थ्यांनी शाळा परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली.

यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या सन्मानार्थ एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला.वृक्षांचे नियमित पाणी देणे,संरक्षण करणे व त्यांची निगा राखणे हीच खरी पर्यावरणसेवा असल्याचा संदेश उपस्थितांना देण्यात आला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून शाळेचा परिसर अधिक हिरवागार करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदविला. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ काटोले,सहशिक्षक गोपाल चौधरी,व्यवस्थापन समिती अध्यक्ष कडुबा सपकाळ,माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष राजू माळी,शंकर जेठे,राजू कोळी,मनोज आगे,रघुनाथ इंगळे,दत्तू जोहरे,सुनीता जोहरे,प्रतिभा इंगळे,मनिषा जेठे तसेच पालक,गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

वृक्ष संवर्धनाचा संदेश देत गुणवंतांचा गौरव;जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा येथे वृक्षारोपण सोहळा संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२७ जुलै : आज लावलेले एक झाड म्हणजे उद्याच्या पिढीला दिलेली अमूल्य भेट होय.वृक्ष हे मानव जीवनाचे आधारस्तंभ असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी,शुद्ध प्राणवायू,अन्न, औषधे व नैसर्गिक संपत्तीचे जतन करण्यासाठी वृक्षांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.हीच जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,सोयगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनावर आधारित प्रभावी नाटिका सादर करून झाडे लावा,झाडे जगवा हा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचविला.विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे पर्यावरण संरक्षणाची प्रेरणा सर्वांना मिळाली. याच कार्यक्रमात चौथी व सहावी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिताताई मोटे (सभापती, शिक्षण समिती,जि.प.छत्रपती संभाजीनगर)या होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे उपस्थित होत्या.यावेळी वृषाली मिरकर (पंचायत समिती सदस्या,सिल्लोड),सभापती उत्तम चव्हाण,राहुल अंकुश राठोड पंचायत समिती सदस्य,नगराध्यक्षा आशाबी तडवी,उपनगराध्यक्षा सुरेखाताई काळे,गजानन पवार, नगरसेविका संध्या मापारी,अमोल जगताप गटविकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव,अक्षय धांदर गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती सोयगाव,सचिन पाटील शिक्षण विस्तार अधिकारी,सोयगाव,फिरोज तडवी (केंद्रप्रमुख, सोयगाव),भगवान सोनवणे अध्यक्ष,शालेय व्यवस्थापन समिती,रवींद्र काळे अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ,बाबूशा (माजी विद्यार्थी संघ सदस्य,दत्तू रोकडे माजी विद्यार्थी संघ सदस्य,मयूर मनगटे,दत्तात्रेय सोनी,मुख्याध्यापक दादाराव राठोड,भास्कर चौधरी, मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,वरंध सर,धनराज बापू यांच्यासह शिक्षक,पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष अनिताताई ज्ञानेश्वर मोटे यांनी विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धन,पर्यावरण संरक्षण आणि दर्जेदार शिक्षणाचे महत्त्व पटवून देत जीवनात मोठी स्वप्ने बाळगून सातत्याने परिश्रम करण्याचे मार्गदर्शन केले.प्रमुख पाहुण्या पुष्पाताई काळे यांनी वृक्ष लागवडीचे महत्त्व सांगतानाच विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवून उच्च ध्येय गाठावे,असा मोलाचा संदेश दिला.अक्षय धांदर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण,शिस्त आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल साधण्याचे आवाहन केले.माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रवींद्र काळे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने शिक्षण घेऊन शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी प्रेरित केले.तसेच राहुल राठोड पंचायत समिती सदस्य यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून वृक्षसंवर्धनात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करत त्यांना प्रोत्साहन दिले. याच कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या विविध कला,हस्तकला, चित्रकला व सर्जनशील उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी शाळेत उभारण्यात आलेल्या कलादालन चे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकर्षक कलाकृती,शैक्षणिक साहित्य व विविध उपक्रमांचे प्रदर्शन पाहून उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे भरभरून कौतुक केले.विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून,अशा कलादालनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि कलाविषयक आवड अधिक विकसित होईल,असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. यानंतर मान्यवरांनी शाळेच्या परिसराची तसेच अत्यंत सुंदर पद्धतीने विकसित करण्यात आलेल्या परसबागेची पाहणी केली.

गणपत वरपे यांचे निधन

सिल्लोड प्रतिनिधी : गावातील ज्येष्ठ नागरिक गणपत सांडू वरपे यांचे दिनांक 25 जुलै रोजी मंगरूळ येथे दुःखद निधन झाले त्यांच्या पाश्चात पत्नी एक भाऊ एक बहीण दोन मुले नातवंडे असा मोठा परिवार आहे शिवसेनेचे विभाग प्रमुख राजू वर्पे व माजी सरपंच मंगरूळ संजय वरपे यांचे ते वडील होते.

देवगिरी बँकेला ४१ कोटींचा नफा; राजस्थानात शाखाविस्ताराची घोषणा

४३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत १२ टक्के लाभांशाला मंजुरी; सभासदांच्या खात्यात तत्काळ जमा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : देवगिरी नागरी सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगरच्या ४३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बँकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळविल्याची घोषणा करण्यात आली. याचबरोबर सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याच्या ठरावाला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली असून, लाभांशाची रक्कम तत्काळ सभासदांच्या खात्यात जमा करण्यात आली.

उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या सभेत बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे बँकेच्या आर्थिक कामगिरीचा आढावा घेतला. यावेळी बँकेला प्राप्त झालेला शेड्युल्ड बँकेचा दर्जा, सुरू करण्यात आलेली इंटरनेट बँकिंग सेवा आणि सातत्याने वाढणारी आर्थिक कामगिरी ही बँकेच्या प्रगतीतील महत्त्वाची टप्पे असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी बँकेचे सभासद व कर्मचारी यांच्या दहावी-बारावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

सभेला महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, महापौर समीर राजूरकर, स्थायी समितीचे सभापती अनिल मकरीये, सभागृह नेते गोविंद केंद्रे यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देवगिरी प्रांताचे प्रांत संघचालक अनिल भालेराव, प्रांत कार्यवाह धनंजय धामणे, प्रांत सहकार्यवाह डॉ. रमेश जाधव, ज्येष्ठ सभासद शरद भोगले, माजी संचालक हिम्मतराव गवळी, रघुवीर ओक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, आजी-माजी संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष किशोर शितोळे यांनी बँकेच्या व्यवसायवाढीबरोबरच आधुनिक बँकिंग सुविधा, डिजिटल सेवा आणि सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला. राजस्थानातील सीकर जिल्ह्यात देवगिरी बँकेची नवीन शाखा सुरू करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, भविष्यात महाराष्ट्रालगतच्या इतर राज्यांमध्येही शाखाविस्तार करण्याचा मानस असल्याची घोषणा त्यांनी केली.

> **"देवगिरी बँक ही केवळ आर्थिक संस्था नसून सभासदांचा विश्वास जपणारी लोकाभिमुख बँक आहे. ४१ कोटी रुपयांचा नफा, शेड्युल्ड बँकेचा दर्जा, इंटरनेट बँकिंग सेवा आणि आता राजस्थानातील शाखाविस्तार ही बँकेच्या प्रगतीची नवी पर्वे आहेत. सभासदांचा विश्वास आणि कर्मचाऱ्यांच्या समर्पित कार्यामुळे देवगिरी बँक राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करेल, असा आम्हाला विश्वास आहे."**
>
> **- किशोर शितोळे, अध्यक्ष**
> **देवगिरी नागरी सहकारी बँक लि.**

सभेदरम्यान सभासदांनी विविध विषयांवर सूचना व प्रश्न उपस्थित केले. त्यास अध्यक्ष किशोर शितोळे, ज्येष्ठ संचालक शिवाजीराव शेरकर, अशोक पाटील, प्रशांत देशपांडे आणि ॲड. मुकेश गोयंनका यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

या सभेला उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक राजेश जैन, सजनराव मते, जयश्री किवळेकर, प्रशांत देशपांडे, नागनाथ काजळे, ॲड. सागर विद्वन्स, प्रा. डॉ. क्षमादेवी खोब्रागडे, डॉ. प्रज्ञा तल्हार, सुरेश जगाडे, व्यवस्थापन मंडळ सदस्य सरदारसिंग बैनाडे यांच्यासह बँकेचे आजी-माजी संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी सूत्रसंचालन केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्ताचे वाचन केले, तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी रुपेंद्र कोयाळकर यांनी आभार मानले.

अभाविप देवगिरी प्रदेशाच्या नव्या कार्यालयाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न

'हे कार्यालय राष्ट्रनिष्ठ, चारित्र्यसंपन्न नेतृत्व घडविणारे प्रेरणाकेंद्र ठरेल' : अतुल लिमये

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) देवगिरी प्रदेशाच्या नव्या कार्यालयाचे भूमिपूजन सोमवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थी चळवळीला अधिक सक्षम दिशा देणे, कार्यकर्त्यांचे संघटन, प्रशिक्षण, संवाद आणि राष्ट्रपुनर्निर्माणाच्या कार्याला गती देण्याच्या उद्देशाने उभारण्यात येणाऱ्या या कार्यालयाच्या भूमिपूजन सोहळ्यास विविध क्षेत्रांतील

मान्यवर, पूर्व कार्यकर्ते, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास कॅबिनेट मंत्री अतुल सावे, कॅबिनेट मंत्री संजय सावकारे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार अनुराधा चव्हाण, आमदार सुहास शिरसाठ, महापौर समीर राजूरकर, शहरातील उद्योजक, पूर्व कार्यकर्ते, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वरुणराज नन्नवरे यांनी केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना अतुल लिमये म्हणाले, "अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य केवळ विद्यार्थ्यांना संघटित करण्यापुरते मर्यादित नसून त्यांना राष्ट्रभक्तीच्या विचाराशी जोडण्याचे आहे. आजच्या वेगवान आणि आकर्षणांनी भरलेल्या काळात विद्यार्थ्यांना योग्य दिशा, वैचारिक स्पष्टता आणि राष्ट्रहिताचे ध्येय देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हे कार्यालय करेल. ही केवळ इमारत नसून राष्ट्रनिष्ठ, चारित्र्यसंपन्न आणि समाजाभिमुख नेतृत्व घडविणारे प्रेरणाकेंद्र ठरेल."

तौरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गिते यांनी सांगितले की, भारताला जागतिक स्तरावर उत्पादन व तंत्रज्ञान क्षेत्रात सक्षम बनविण्यासाठी गुणवत्तापूर्ण आणि राष्ट्रहिताची जाणीव असलेले नेतृत्व आवश्यक आहे. विद्यार्थी परिषद अशा नेतृत्वनिर्मितीचे प्रभावी कार्य करत असून देवगिरी प्रदेशाचे हे नवे कार्यालय त्याला अधिक बळ देईल.

अभाविपचे राष्ट्रीय संघटनमंत्री आशिष चौहान यांनी परिषदेच्या ७७ वर्षांच्या राष्ट्रनिष्ठ प्रवासाचा आढावा घेत, अभाविप ही केवळ विद्यार्थी संघटना नसून राष्ट्रपुनर्निर्माणाची चळवळ असल्याचे सांगितले.

गुन्हे शाखेच्या PSI ला लाच प्रकरण भोवले; 50 हजारांची मागणी करणाऱ्या चंद्रकांत कामठें विरोधात गुन्हा दाखल!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शहरातील पोलिस दलात मोठी खळबळ उडवून देणारी बातमी समोर आली आहे. फसवणुकीचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यासाठी व तपासात मदत करण्याच्या मोबदल्यात तब्बल ५० हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक (PSI) चंद्रकांत कामठे यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) गुन्हा दाखल केला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील ६० वर्षीय तक्रारदाराने दाखल केलेल्या अर्जात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी आणि गुन्ह्यातील आरोपींना अटक करून मदत करण्यासाठी PSI चंद्रकांत कामठे यांनी ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.

तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी या प्रकरणी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे येऊन तक्रार नोंदवली. या तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीच्या पथकाने दि. ११ मार्च रोजी पंचांसमक्ष लाच मागणीची पडताळणी केली. या पडताळणी दरम्यान PSI चंद्रकांत कामठे यांनी स्वतःसाठी आणि तत्कालीन पो.नि. श्री. पवार यांच्यासाठी ५० हजार रुपयांची मागणी करून तडजोडीअंती ही रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले होते. पडताळणी दरम्यान संबंधित पोलीस निरीक्षकांची भेट झाली नव्हती. त्यानंतर आरोपी PSI कामठे यांना संशय आल्याने त्यांनी तक्रारदारास भेटण्यास टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. तसेच, संबंधित पोलीस निरीक्षकांची त्या ठिकाणावरून बदली झाल्यामुळे आरोपी आता मागणी केलेली लाचेची रक्कम स्वीकारणार नाही, असा जबाब तक्रारदाराने दिला.

माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यास प्रशासन कटिबद्ध : संजयसिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

परभणी : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात 27 वा कारगिल विजय दिवस कृतज्ञतापूर्वक साजरा करण्यात आला. यावेळी कारगिल युद्धातील शहीद जवानांना अभिवादन करून त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा

सैनिक कल्याण अधिकारी अनुराधा ढालकरी यांच्यासह शहीद जवानांचे कुटुंबीय, माजी सैनिक तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी आणि शहीद जवान यांच्या कुटुंबीयांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शहीद जवानांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व शहीद कुटुंबीयांचा श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

आषाढी वारीत एमजीएमच्या विद्यार्थ्यांचा स्वच्छतेचा संकल्प; छोटा पंढरपूर परिसर केला स्वच्छ

मंदिर परिसर आणि यात्रा मार्गावरील कचरा संकलित करून महानगरपालिकेकडे सुपूर्द

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : आषाढी एकादशीच्या निमित्ताने महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या विद्यार्थ्यांनी वाळूजजवळील प्रसिद्ध छोटा पंढरपूर येथे स्वच्छता मोहीम राबवत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यापीठाच्या वतीने स्वच्छतेचा संकल्प करत १०० हून अधिक स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या मोहिमेत एमजीएमच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय, डॉ. जी. वाय. पाठ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी तसेच युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस आदी महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

आषाढी एकादशीला छोटा पंढरपूर येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असल्याने परिसर स्वच्छ राहावा, या उद्देशाने एनएसएसच्या स्वयंसेवकांनी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर आणि यात्रा मार्गाची स्वच्छता केली. ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करून तो महानगरपालिकेच्या संकलन केंद्राकडे सुपूर्द करण्यात आला.

या उपक्रमात विद्यापीठाचे एनएसएस समन्वयक डॉ. आर. आर. देशमुख, विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, कर्मचारी आणि स्वयंसेवक सहभागी झाले होते. 'नॉट मी बट यू' हे एनएसएसचे ब्रीद प्रत्यक्ष कृतीत उतरवत विद्यार्थी दरवर्षी वारीत सेवा कार्यात सहभागी होतात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव अधिक दृढ होत असल्याचे डॉ. देशमुख यांनी सांगितले.

या स्वच्छता मोहिमेत डॉ. वंदना मालोदे, डॉ. आर. डी. कोकाटे, डॉ. सामी, डॉ. दानिश अली, डॉ. रवी कोमटे, डॉ. किरण जाधव यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.

देवाभाऊंच्या वाढदिवसानिमित्त 'लाडक्या बहिणीं'चा हरित संकल्प

56 हजार वृक्षलागवडीचे लक्ष्य; छत्रपती संभाजीनगरात 10 हजार वृक्षारोपणाने अभियानाची दमदार सुरुवात

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६व्या वाढदिवसानिमित्त 'देवा भाऊंच्या लाडक्या बहिणीं'नी ५६ हजार वृक्षलागवडीचा संकल्प करत पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश दिला. या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात सोमवारी देवळाई वनक्षेत्रात १० हजार वृक्षांचे सामूहिक वृक्षारोपण करून करण्यात आली.

'देवेंद्रजी जन्मोत्सव–हरित महोत्सव' आणि 'हरित महाराष्ट्र सप्ताह' अंतर्गत मराठवाड्यात ५ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट

निश्चित करण्यात आले आहे. या अभियानाला मिळणाऱ्या वाढत्या जनसहभागाचा भाग म्हणून 'देवा भाऊंच्या लाडक्या बहिणीं'नी ५६ हजार वृक्षलागवडीची जबाबदारी स्वीकारली आहे.

देवळाई वनक्षेत्र, निसर्ग हॉटेलसमोर धुळे–सोलापूर महामार्ग परिसरात झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात महिला कार्यकर्त्यांसह नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. "संकल्प हरित महाराष्ट्राचा... सहभाग प्रत्येक जनमानसाचा" या संदेशातून पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

मराठवाड्यात ५ लाख वृक्षलागवडीचा संकल्प करणारे माजी आमदार तथा देवा सेवा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष संजय केणेकर यांच्या हरित अभियानाला 'लाडक्या बहिणीं'चा मिळालेला हा प्रतिसाद विशेष ठरला. पहिल्या टप्प्यात १० हजार वृक्षांचे वृक्षारोपण पूर्ण झाले असून उर्वरित वृक्षलागवड टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव गंगाताई ताठे, प्रदेश महिला मोर्चा सचिव तथा नगरसेविका अमृताताई पालोदकर, महामंत्री तथा नगरसेवक हर्षवर्धन कराड, उपवनसंरक्षक सुवर्णा माने, विभागीय वन अधिकारी संदीप गिरी, वन अधिकारी चव्हाण मॅडम, सागर कुटे, आशाताई कटके, दिव्या पाटील, मीनाताई मिसाळ, कमलेश जैन, गणेश डोंगरे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लिटिल एंजल इंग्लिश स्कूलमध्ये चिमुकल्यांची पंढरीची वारी; भक्ती, संस्कृती आणि पर्यावरणाचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त नागेश्वरवाडी येथील लिटिल एंजल इंग्लिश स्कूलमध्ये चिमुकल्यांनी साकारलेल्या 'पंढरीच्या वारी'ने भक्तिमय वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, वारकरी तसेच विविध संतांच्या आकर्षक वेशभूषेत सहभागी होत वारकरी परंपरेचे दर्शन घडवले.

कार्यक्रमात संस्थेच्या प्राचार्या डॉ. योगिता शास्त्री राहतेकर आणि संचालक सुधीर

शास्त्री यांनी विद्यार्थ्यांना संतांचे जीवनकार्य, वारकरी संप्रदायाची परंपरा आणि भारतीय संस्कृतीचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

चिमुकल्यांनी अभंग, भक्तिगीते आणि वारकरी परंपरेशी निगडित सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. तसेच भक्ती, एकात्मता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेशही आपल्या सादरीकरणातून दिला.

रिक्षाचालक बांधवांना ड्रेसचे वाटप; वाहतूक शिस्तीचे पालन करण्याचे आवाहन

सर्वपक्षीय मुस्लिम आघाडी व नशामुक्त अभियानाचा सामाजिक उपक्रम

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

रिक्षाचालक बांधवांमध्ये शिस्त, सुरक्षितता आणि सामाजिक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सर्वपक्षीय मुस्लिम आघाडी व नशामुक्त अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने रिक्षाचालक बांधवांसाठी ड्रेस वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोमवार, २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता मुख्य बस स्थानक परिसरातील वाहतूक पोलीस चौकीजवळ हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मंगेश जगताप आणि सर्वपक्षीय मुस्लिम आघाडीचे संस्थापक अध्यक्ष साजिद मौलाना यांच्या हस्ते रिक्षाचालक बांधवांना ड्रेसचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात रिक्षाचालक बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक मंगेश जगताप म्हणाले की, "सर्वप्रथम सर्वपक्षीय मुस्लिम आघाडीचे संस्थापक अध्यक्ष साजिद मौलाना आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानतो. रिक्षाचालक बांधवांसाठी ड्रेस वाटपाचा हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. माझ्या हस्ते रिक्षाचालक बांधवांना ड्रेसचे वाटप होत असल्याचा मला आनंद आहे."

"रिक्षाचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. नियमांचे उल्लंघन करू नये, युनिफॉर्ममध्ये रिक्षा चालवावी आणि प्रवाशांशी शिस्त व सौजन्याने वागावे. वाहतूक पोलिसांना सहकार्य करून नियमांचे पालन केल्यास दंडात्मक कारवाईची वेळ येणार नाही. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी रिक्षाचालक आणि वाहतूक पोलिसांनी परस्पर सहकार्याने काम करणे गरजेचे आहे," असेही पोलीस निरीक्षक मंगेश जगताप यांनी सांगितले.

यावेळी सर्वपक्षीय मुस्लिम आघाडीचे संस्थापक अध्यक्ष साजिद मौलाना म्हणाले की, "रिक्षाचालक बांधव हे शहराच्या दैनंदिन वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहेत. वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मंगेश जगताप यांनी आपल्या व्यस्त वेळेतून अमूल्य वेळ देऊन या कार्यक्रमास उपस्थिती लावली, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार."

"रिक्षाचालकांनी रिक्षा रस्त्याच्या एका बाजूला शिस्तीत उभी करावी, वाहतूक नियमांचे पालन करावे, सिग्नलचे नियम पाळावेत आणि युनिफॉर्म परिधान करून रिक्षा चालवावी. पोलिसांना सहकार्य केल्यास शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक चांगली होण्यास मदत होईल. रिक्षाचालक बांधवांना एक छोटीशी मदत म्हणून प्रत्येक रिक्षाचालकाला ड्रेस देण्याचा उपक्रम आम्ही हाती घेतला आहे. या सामाजिक उपक्रमाला सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला," असे साजिद मौलाना यांनी सांगितले.

या कार्यक्रमास नशामुक्ती अभियानाचे महासचिव राधाकिशन पंडित, सर्वपक्षीय मुस्लिम आघाडीचे महासचिव खालेद नाहदी, सलीम शाह व शेख सलीम सर, उपाध्यक्ष धीरज पवार व बने खाँ पठाण यांच्यासह फारूक खान, समाजसेवक मुसा खान,अशोक खोसरे पाटील, राहुल शिरसाठ, हफीज अली, शेख अब्दुल रईस, अब्दुल कय्यूम (कोषाध्यक्ष), अशरफ पठाण, युसूफ खान, भीमसेन कांबळे, खिजर सिद्दीकी, दिशा आकाश सुरवसे पाटील, डॉ. शेख शकील, शेख मुकरम, शेख मोहसीन सर, भिकन भाई, किशोर म्हस्के यांच्यासह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, रिक्षाचालक बांधव व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

या सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. रिक्षाचालकांनीही वाहतूक नियमांचे पालन करून शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911